खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे. ४१० ५०५

## प्रथम वर्ष कला

## द्वितीय सत्र

## भूगोल ( जी– १ )

विषय -Gg 110 (A) भूगोल (मानवी भूगोल)

प्रा. दिलीप ज्ञानेश्वर मुळूक

भूगोल विभाग

शैक्षणिक वर्ष २०१९ – २०२०पासून

# प्रकरण तिसरे - वसाहती

# अभ्यास घटक - भारतातील नागरीकरण

HRMGEOG

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

## राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे ४१०५०५

### नवीन अभ्यासक्रम सेमीस्टर पॅटर्न २०१९

### द्वितीय सत्र अभ्यासक्रम

वर्ग - प्रथम वर्ष कला (FYBA)

विषय - Gg 110 (B) भूगोल (मानवी भूगोल)

| अ. नं. | घटक | उपघटक | तासिका | एकूण श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| 1. | मानवी भूगोलाचा परिचय | 1. मानवी भूगोल – व्याख्या आणि अर्थ<br>2. मानवी भूगोलाचे स्वरूप आणि व्याप्ती<br>3. मानवी भूगोलाच्या शाखा आणि महत्त्व | 12 | 03 |
| 2. | लोकसंख्या | 1. लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक<br>2. लोकसंख्या संक्रमण सिंध्दात<br>3. भारतीय लोकसंख्येची संरचना (लिंगरचना आणि साक्षरता) | 12 | |
| 3. | वसाहती | 1. ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारूप (आकृतीबंध)<br>2. भारतातील नागरीकरण<br>3. महाराष्ट्रातील नागरीकरण | 12 | |
| 4 | कृषी / शेती | 1. शेतीचे प्रकार<br>2. शेतीवर परिणाम करणारे घटक<br>3. भारतीय शेतीसमोरील समस्या | 12 | |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रथम वर्ष द्वितीय सत्रासाठी कला भूगोल विषयाच्या पाठ्यक्रमाचा अनुवाद

# प्रकरण तिसरे

# वसाहती (Settelment)

# अभ्यास घटक क्रमांक ३

# भारतातील नागरीकरण

१. नागरीकरणाचा अर्थ
२. नागरीकरणाची व्याख्या
३. नागरीकरणाचे निकष
४. भारतातील नागरीकरणाचे निकष
५. भारतातील नागरीकरणाचा इतिहास
६. भारतातील नागरिकीकरणाचा कल
७. भारतातील नागरीकरण २०११
८. भारतातील शहरी लोकसंख्येची टक्केवारी २०११
९. भारतातील सर्वाधिक नागरी लोकसंख्या राज्य
१०. भारतातील कमी नागरी लोकसंख्या राज्य
११. संघराज्यातील (केंद्रशासीत प्रदेश) नागरी लोकसंख्येचे प्रमाण
१२. भारतातील नगारी विभाग
१३. भारतातील नागरिकीकरणाचे २०११ च्या जनगणना अहवालानुसार विश्लेषण
१४.भारतातील २०११ च्या जनगणना अहवालानुसार दशलक्षी शहरांचे विश्लेषण
१५.भारतातील नागरीकरणाची वैशिष्टये

## १. नागरीकरणाचा अर्थ

नागरीकरण हा शब्द इंग्रजीतील Urban (अर्बन) या शब्दापासून बनला आहे. Urban हा शब्द लॅटिन भाषेतील Urbs (अर्ब्स) या शब्दापासून तयार झालेला आहे. लॅटिन भाषेत Urbs या शब्दाचा अर्थ नगर असा होतो या प्रकारे Urban शब्दाचा अर्थ नगरासंबंधी किंवा शहरासंबंधी अथवा नगरात किंवा शहरात असा होतो. नागरीकरणाची संकल्पना (अर्थ, प्रक्रिया समजून घेताना एखाद्या ठिकाणाची वाढ कशी व कोणत्या प्रकारे होते हे पाहणे महत्त्वाचे आहे. नेल्सन अंडरसनच्या मतानुसार, ”ज्या ठिकाणी उद्योगधंद्यांचा (कारखाने) अधिक प्रमाणात विकास होऊन तेथील जीवनपध्दती ग्रामीण भागापेक्षा वेगळी तयार होते, अशा बदलास नागरीकरण असे म्हणतात. आधुनिक काळात उद्योग्धंद्यांमुळे ज्या ठिकाणाची मोठ्य प्रमाणात प्रगती होते, की ती ठिकाणे उद्योगधंद्यांची केंद्रे बनली आहेत. त्या ठिकाणाकडे निरनिराळ्या भागांतील अनेक लोक रोजगार मिळविण्यासाठी येऊ लागतात. त्यामुळे त्या ठिकाणची पूर्वीची जीवन पद्धती बदलुन नवीन व वेगळी पद्धती तयार होते. ही पद्धती खेड्यापेक्षा वेगळी असते. कारण उद्योगधंद्याच्या ठिकाणी असलेले बहुतांश लोक द्वितीय श्रेणीच्या व्यवसायात गुंतलेले असतात. तर ग्रामीण भागातील लोक कृषी व्यवसायात गुंतलेले असतात. त्यामुळे ग्रामीण भागापेक्षा शहरातील जीवनपद्धती वेगळी असते.

## नागरीकरणाची व्याख्या

**‘ग्रामीण वसाहती, तेथील व्यवसाय व उत्पादने यांचे वेगळया वसाहती, वेगळे व्यवसाय व वेगळया उत्पादनांत होणारे रूपांतर म्हणजे नागरीकरण होय.’ — संयुक्त राष्ट्रसंघ**

**‘नागरीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्या प्रक्रियेत ग्रामीण वसाहतीचे नागरी वसाहतींमध्ये रूपांतर होत असते.’ — अर्नेस्ट बर्गेल**

**‘नागरीकरण प्रक्रियेत सभोवतालच्या ग्रामीण भागातून नागरी भागाकडे सतत स्थलांतरित होणाऱ्या असंख्य लोकांच्या समूहाला नागरीकरण असे म्हणतात.’ — मार्विन ओल्सन**

**‘ज्या ठिकाणी उद्योगशिलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवन पध्दती नवीन तयार होते त्यास नागरीकरण असे म्हणतात’. — नेल्स ॲडरसन**

नागरीकरणात एखाद्या ठिकाणी उद्योगधंदे सुरू झाले म्हणजे तेथील पूर्वीचे व्यवसाय बदलून नवीन व्यवसाय येतात. पूर्वीच्या उत्पादनांत बदल होतात आणि तेथे एक वेगळीच वसाहत स्थापन होते. ही वसाहत खेड्यापेक्षा पूर्णपणे वेगळी असते. अशा प्रकारे बदल झाला म्हणजे त्या ठिकाणाचे नागरीकरण झाले असे समजावे.

## नागरीकरणाचे निकष

नागरी भाग ओळखण्यासाठी युनायटेड नेशन्सने प्रमुख सात निकष सांगितले आहेत.

### १) लोकसंख्येचा आकार व घनता

ग्रीनलॅंडमध्ये ३००, डेन्मार्क २००, आईसलॅंड ३००, व्हेनेझुएला १०००, न्यूझीलंड १५०, आयर्लंड २०००, फ्रान्स, अर्जेंटिना २५००, ग्रीक १०००, जपान ३०००, यू.एस.ए., मेक्सिको व भारतामध्ये ५००० लोकसंख्या मर्यादा हा ग्रामीण व शहरी भाग ओळखण्याचा मुख्य बिंदु आहे. ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या

असणाऱ्या ठिकाणाला नगर म्हटले जाते. ग्रामीण भागामध्ये लोकसंख्येची घनता २०० ते १००० व्यक्ती प्रति प्रति चौ.कि.मी. असू शकते. शहरी भागामध्ये कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त ५००० व्यक्ती प्रति चौ.कि. मी. लोकसंख्या घनता असल्यास तेथे नागरीकरण झाल्याचे समजले जाते.

**२) आर्थिक कार्य**

भारतात १९९१ च्या जनगणनेनुसार एकूण कामकरी लोकसंख्येपेकी शहरी भागात ७५ टक्के बिगरशेती व्यवसायांत व २५ टक्के शेती व्यवसायात गुंतलेले असावेत.

**३) सामाजिक मूल्ये**

नागरी भागामध्ये विविध जातींचे व विविध भाषा बोलणारे लोक असतात. शहरामध्ये अस्पृश्यता पाळली जात नाही, शहरी भागाची संस्कृती ग्रामीण भागापेक्षा वेगळी असते. फॅशन–राहणीमानात भिन्नता असते. शहरामध्ये सामाजिक मूल्ये जास्त प्रभावी असतात.

**४) व्यवस्थित नगररचना**

नागरी भागामध्ये घरांची रचना व्यवस्थित असते. मोटारीसाठी, पादचाऱ्यांसाठी रस्ते वेगवेगळे असतात, रस्ते विभाजक असतात, शहरामध्ये स्नानगृहे, शौचालय, नळ, वीजपुरवठा, सार्वजनिक कार्यालये, न्यायव्यवस्था, संरक्षणदले, दवाखाने, वाहतुकीची साधने, सांडपाण्यासाठी नाल्या असतात, कचऱ्यासाठी कुंड्या असतात, दररोज शहराची साफसफाई केली जाते.

**५) कार्यात्मक निकष**

नगरामध्ये व्यापारात्मक कार्य करणारी लोकसंख्या जास्त असते, नागरी भागात दररोज बाजार असतो, नगरामध्ये कपडा, स्टेशनरी, किराणा, औषधी, सराफ, अडत लाईन असे बाजार असतात. यावरून शहर व ग्रामीण भाग ओळखता येते.

**६) शासकीय प्रदेश**

शासकीय सोईसाठी प्रांताची मुख्यालये, राजधानी, जिल्हा, तालुका, विभागीय कार्यालये ज्या ठिकाणी असतात, त्याला नगर असे म्हणतात.

**७) स्थानिक शासन संस्था असलेला प्रदेश**

ज्या प्रदेशांत एक विशिष्ट स्वायत्तता शासन प्रणाली असते, त्यांनाही नगर म्हणावे. उदा. नगरपालिका.

## भारतातील नागरीकरणाचे निकष

**१९९१ च्या भारतीय जनगणनेनुसार नगर या संज्ञेत तीन गोष्टी अंतर्भूत केल्या आहेत**

१) कितीही लोकसंख्या असलेली नगरपालिका.

२) नगरपालिकांच्या हद्दीत नसलेल्या सर्व सिव्हिल लाईन.

३) ५०००पेक्षा जास्त व्यक्तींची कायम वस्ती असलेले कोणतेही ठिकाण.

या व्याख्येमध्ये लोकसंख्या हा महत्त्वाचा निकष असून शासकीय विभाग हा मुख्य निकष आहे. उदा. छावणी, वसाहती यांची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असते, तरीही याला नगर म्हटले आहे. भारतामध्ये

संस्थानांचे विलीनीकरण झाले. १९५१ पासुन पंचवार्षिक योजनांना सुरुवात झाली, म्हणून १९६१ च्या भारतीय जनगणनेने नागरीकरणाच्या वास्तवतेवर भर देऊन व्याख्या केलेली आहे आणि तीच व्याख्या १९९१ च्या जनगणनेने वापरली आहे. १९९१ च्या जनगणनेने नागरीकरणाचे पुढील प्रमाणे काही निकष सांगितलेले आहेत.

**१) सर्व नगरपालिका, महानगरपालिका, लष्करी वसाहती, छावणी यांचा समावेश शहरी प्रदेशात करावा.**

**२) बाकीच्या वस्तीस्थानासाठी पुढील तीन कसोट्या पूर्ण होणे गरजेचे आहे.**

**अ) किमान ५००० लोकसंख्या असावी.**

**ब) आर्थिक कार्यानुसार एकूण कामगारांच्या ७५ टक्के कामगार बिगर शेती व्यवसायात गुंतलेले असावेत.**

**क) प्रति चौरस कि.मी.ला ४०० व्यक्ती किंवा त्यापेक्षा अधिक असावी.**

वरील निकष ज्या वस्तीस्थानाला लागू पडतात तेथे नागरीकरण झाले आहे असे म्हणतात.

**भारत सरकारच्या जनगणना विभागाने नागरी लोकसंख्या विचार घेऊन नागरी वसाहतींचे सहा प्रवर्ग केले आहेत ते पुढीलप्रमाणे**

**तक्ता क्रमांक – १. लोकसंख्येच्या अधारे नगरांचे प्रवर्ग**

| अ.नं. | वर्ग | लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | I | १००००० हून अधिक |
| २. | II | ५०००० ते ९९९९९ |
| ३. | III | २०००० ते ४९९९९ |
| ४. | IV | १०००० ते १९९९९ |
| ५. | V | ५००० ते ९९९९ |
| ६. | VI | ५००० हून कमी लोकसंख्या |

शासकीय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यासाठी भारत सरकारकडून लोकसंख्या आणि इतर निकषांच्या अधारे शहरांचे तीन गटात वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ते गट इंग्रजीतील **X, Y, आणि Z** या अक्षरांनी अधोरेखीत केलेले असतात. यातील X क्लास मध्ये अहमदाबाद, बंगलोर, चेन्नई, दिल्ली, हैद्राबाद, कोलकत्ता, मुंबई आणि पुणे या आठ शहरांचा समावेश करण्यात आलेला आहे. या सर्व शहरांची लोकसंख्या ५० लाखाहून अधिक आहे. तर Y क्लास या वर्गामध्ये ५ लाख ते ५० लाख लोकसंख्या असणाऱ्या शहरांचा समावेश करण्यात आला आहे. य वर्गामध्ये भारतातील एकूण विजयवाडा, वारंगल, ग्रेटर विशाखापट्टणम, गुंटूर, नेल्लोर, गुवाहाटी, पटना, चंदीगड, दुर्ग–भिलाई नगर, रायपूर, राजकोट, जामनगर, भावनगर, वडोदरा, सुरत, फरीदाबाद, गुरगाव, श्रीनगर, जम्मू, जमशेदपूर, धनबाद, रांची, बोकारो स्टील शहर, बेळगाव, हुबळी–धारवाड, मंगलोर, मैसूर, गुलबर्गा, कोझिकोड, कोची, तिरुवंतपुरम, थ्रीसुर, मलप्पुरम, कन्नूर, कोल्लम, ग्वालियर, इंदूर, भोपाल, जबलपूर, उज्जैन, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, भिवंडी, सोला कोल्हापूर, वसई–विरार सिटी, मालेगाव, नांदेड–वाघाळा, सांगली, कटक, भुवनेश्वर, राउरकेला, अमृतसर, जालंधर, लुधियाना, पुडुचेरी, बीकानेर, जयपूर, जोधपूर, कोटा, अजमेर, सालेम, तिरुपूर, कोयंबटूर, तिरुचिराप्पल्ली, मदुराई, एरोडे , देहरादून, मुरादाबाद, मेरठ, गाझियाबाद, अलिगड, आग्रा, बरेली, लखनऊ, कानपूर, अलाहाबाद, गोरखपूर, वाराणसी, सहारनपूर, नोएडा, फिरोजाबाद, झांसी, आसनसोल, सिलीगुडी, दुर्गापूर ही ८८ शहरे आहेत. उर्वरित सर्व

शहरांचा आणि ठिकाणांचा समावेश Z या वर्गात करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे वर्गवारी करत असताना २०११ च्या जगणनना अहवालाची आकडेवारी प्रमाण मानण्यात आलेली आहे.

## भारतातील नागरीकरणाचा इतिहास

युरोपातील मेसोपोटेमिया व इजिप्त मधील नाईल नदीच्या संस्कृतीप्रमाणेच भारताच्या नागरिककरण्याला देखील एक दीर्घकालीन इतिहास आहे. यामधील पहिला कालखंड महत्त्वाचा असून तो सिंधू नदीच्या खोऱ्याशी निगडित आहे. सिंधू नदीच्या खोऱ्यात हरप्पा संस्कृतीने सुरू झालेला हा इतिहास दिसून येतो. भारताच्या नागरीकरणात सातत्य दिसून येत नसले तरी येथील नागरीकरणाची प्रक्रिया कधी अखंडपणे तर कधी मंद गतीने विकसित झालेली दिसते. ऐतिहासिक दृष्ट्या भारताच्या नागरीकरणाच्या प्रक्रियेचे वर्णन करणे अवघड असले तरी अशक्य नाही. भारतातील नागरीकरणाच्या इतिहासातील काही महत्त्वाचे कालखंड पुढीलप्रमाणे

**१) इतिहास पूर्व कालखंड (खिस्तपूर्व ३२५० ते १८००)**

**२) आद्य इतिहास कालखंड (खिस्तपूर्व ६०० ते इ.स. ५००)**

**३) मध्ययुगीन कालखंड (इ. स. ६०० ते इ. स. १८००)**

**४) ब्रिटिश कालखंड (इ. स. १८०० ते इ. स. १९४७)**

**५) स्वातंत्र्योत्तर कालखंड (इ. स. १९४७ नंतर)**

भारतातील नागरीकरणाची प्रक्रिया अधून—मधून खंडित होत गेल्यामुळे तिचा समग्रह इतिहास सांगणे अशक्य आहे परंतु प्रत्येक कालखंडातील काही महत्वाच्या घटना नमूद करणे शक्य आहे

**१) इतिहास पूर्व कालखंड (खिस्तपूर्व ३२५० ते १८००)**

भारतातील नागरीकरणाची सुरुवात सिंधू नदीच्या खोऱ्यात जवळ—जवळ ४५०० वर्षांपूर्वी झालेली दिसून येते. त्यापुर्वी देखील उत्तर मध्य व दक्षिण भारतात पुरातत्व शास्त्रज्ञानी ऐतिहासिक पुरावे देऊन नागरी संस्कृतीचे अस्तित्व असल्याचे नमूद केले आहे. त्यावेळी शेती व पशुपालन करणे हे संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होते. भारतात नागरी संस्कृतीचे अनेक अवशेष आढळून आलेले आहेत. या वसाहतींमधील रस्ते घरांची रचना सांडपाणी व्यवस्था या बाबीकडे लक्ष देण्यात आल्याचे दिसून येते. त्या काळातील लोकांची वेशभूषा व रोजच्या जीवनातील अन्नपदार्थ यासारख्या बाबी वरून नागरी जीवनाची पुष्कळशी माहिती मिळण्यास मदत होते. सिंधू नदीच्या खोऱ्यात नगरे कशी अस्तित्वात आली याबद्दल विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. मात्र भारतात नागरी संस्कृती मेसोपोटोमियातून आली असे वाटते. अर्थात त्यासाठी तेथील लोक स्थलांतर करून भारतात आले असतील असा एक अंदाज आहे. मोहनजोदारो व हरप्पा याठिकाणी झालेल्या उत्खननातून अशी माहिती पुढे आली आहे की मेसोपोटेमिया व भारतातील नगरे ही वास्तू शिल्पकला व घरांची रचना याबाबत सार्धम्य असलेली दिसतात. याच कालखंडातील लोथल, कालीबंगन, बनवली, सूरकोवा, रंगपुर व रोजरी ही शहरे देखील विकसित झाल्याचे दिसतात.

**२) आद्य इतिहास कालखंड (खिस्तपूर्व ६०० ते इ.स. ५००)**

भारतातील नागरीकरणाचे दुसरे पर्व सुमारे खिस्तपूर्व ६०० पासून सुरू होऊन ते इस ५०० ला संपते. या कालखंडात उत्तरेत आर्य तर दक्षिणेत द्रविड जनजाती भारताच्या निरनिराळया भागात वसाहती करून राहात होत्या. हे पर्व भारतातील नागरीकरण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे या काळानंतर खऱ्या अर्थाने नागरीकरण हे भारताचे एक कायम वैशिष्ट्ये बनल्याचे दिसते. भारतातील सध्याची शहरे उदा. वाराणसी, पाटणा, पाटलीपुत्र ही उत्तरेतील तर मदुराई, कांचीपुरम ही दक्षिणेतील शहरे याच काळात अस्तित्वात आल्याची वारसा सांगणारी अनेक लक्षणे आहेत. भारतातील नागरीकरणाचा हा कालखंड जवळजवळ एक हजार वर्षाचा आहे त्यामुळे वेदोत्तर काळ, मौर्य काळ आणि मौर्योत्तर काळ हे सर्व कालखंड याच कालखंडात विभागले गेले आहेत. या कालखंडामध्ये हस्तिनापुर, श्रावस्ती, कपिलवास्तू, उज्जैन, राजगिरी, आयोध्या, वाराणसी, कुसुंबी ही शहरे देखील विकसित झाली. दक्षिण भारतातील मदुराई, पट्टन, वांजी, उरयूर, कोरकई ही त्या काळातील महत्वाची नगरे होती.

**३) मध्ययुगीन कालखंड (इ. स. ६०० ते इ. स. १८००)**

मध्ययुगीन कालखंड इसवी सनाच्या पाचव्या शतकापासून सुरू होऊन ब्रिटीश काळापर्यंत मानला जातो. उत्तर भारतात नागरीकरणाला लागलेली उतरती कळा नंतरची अनेक शतके कायम राहील. या काळात मोठमोठी साम्राज्य लयास जाऊन त्यांची जागा लहान लहान राजघराण्यांनी घेतली. याच काळात बौद्ध धर्माचा प्रभाव ओसरून हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन झाले. हिंदू धर्मप्रसारासाठी भारतातील चार भागात मठांची स्थापना करण्यात आली. हिमालयात जोशीमठ, ओरिसात पुरी, गुजरातमध्ये द्वारका तर कर्नाटकात शृंगेरी येथे हिंदू धर्म पीठाची स्थापना झाली. ही धर्मपीठे कालांतराने नागरी केंद्रे म्हणून विकसित पावली. याच कालखंडामध्ये नाशिक, पुरी, कटक, भडोच, उज्जैन, मछलीपट्टणम, ही शहरे विकसित झाली. तसेच नागार्जुन, कोटा, धरणी, विजयवाडा राजमहेंद्री, नेल्लोर, तंजावर, याच काळात दिल्ली, दौलताबाद, तंजावर, फिरोजाबाद ,आग्रा, तुघलकाबाद ही शहरे मुसलमान राजांनी वसविली. या कालखंडात उत्तर भारतामध्ये मथुरा, थाणेश्वर, अलाहाबाद, वाराणसी, पाटलिपुत्र, उज्जैन, धार, सोमनाथ, मिरज, पानिपत, भडोच, बडोदा श्रीनगर ही शहरे महत्त्वाची समजली जात होती. अकबराच्या दरबारातील अबूल फजल याने मोगल साम्राज्यात इसवीसन १५९४ मध्ये २८३७ नगरे होती असे नमूद केले आहे, ज्यामध्ये १८० मोठी शहरे होती. बंगाल, बिहार, माळवा, गुजरात, लाहोर, मुलतान या सर्व सुभ्यांमध्ये ही शहरे विखुरलेली होती. मोगलांच्या काळातील महत्त्वाची शहरे म्हणजे आग्रा, सिक्री, दिल्ली, अहमदाबाद, कंबोज, बुऱ्हानपुर, अजमेर, उज्जैन, मांडू, अवध, लखनऊ, वाराणसी, जवनपुर, कटक, जोनपुर, आजही ही सर्व शहरे एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे आहेत. यापैकी अनेक शहरे मोगल भारतात येण्यापूर्वी देखील अस्तित्वात होती परंतु मुगल कालखंडामध्ये या शहरांच्या विकासामध्ये मोलाची भर पडल्याची दिसते. याच कालखंडामध्ये मराठ्यांनी पुणे येथे आपली राजधानी स्थापन केल्यानंतर मराठी साम्राज्याचा विस्तार दक्षिणेतील मदुरा व तंजावर पर्यंत केला. मराठी राजांनी हिंदूंची मोठी मंदिरे बांधून आपल्या ताब्यातील नागरी केंद्रांचे संरक्षण केले. त्यावेळी दख्खनच्या पठारावर गोवळकोंडा, विजापूर, अहमदनगर, गुलबर्गा, बदामी, कोल्हापूर, पुणे, हम्पी, हैदराबाद ही शहर महत्वाची मानली जात होती. हिंदू समाज त्या काळी ग्रामीण भागात राहत असल्यामुळे सहाजिकच नागरीकरणावर मुसलमानी वास्तुशिल्पांचा प्रभाव झालेला दिसतो.

**४) ब्रिटिश कालखंड (इ. स. १८०० ते इ. स. १९४७)**

ब्रिटिश कालखंडामध्ये नागरीकरणाची भरभराट झाल्याचे दिसते. इसवीसन १८०० ते इसवी सन १९४७ पर्यंतच्या कालखंडात ब्रिटिश, पोर्तुगीजा, डच, आणि फ्रेंचांनी समुद्र किनारपट्टीच्या प्रदेशात बंदरांचा विकास केला. भारतात पोर्तुगिजांनी पहिल्यांदा दोन नवीन शहरे स्थापन केली, पोर्तुगिजांनी गोव्यातील पणजी (१५१०) व महाराष्ट्रातील मुंबई (१५३२) ही दोन बंदरे विकसित केली. डचांनी मछलीपट्टनम (१६०५) व नागपट्टनम (१६५८), फ्रेंचांनी पॉडेचरी (१६७३) व चंद्रनगर (१६९०), तर ब्रिटिशांनी मद्रास (१६३९) व कलकत्ता (१६९०) ही शहरे वसवली. ही सर्व शहरे युरोपातील लोकांच्या वसाहती होत्या. युरोपातील व्यापाऱ्यांनी बंदरांच्या विकासावर अधिक भर दिला कारण त्या काळातील व्यापार जलमार्गाने होत होता. इ.स. १८०० च्या सुमारास भारतात एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या १६ होती. व त्यावेळी जवळजवळ १५०० नगरे देशाच्या विविध भागात वसलेली होती. त्यातील एक तृतीयांश शहरे गंगेच्या खोऱ्यामध्ये विखुरलेली होती. संपूर्ण भारतामध्ये तुलनेने पश्चिम व दक्षिण भागांमध्ये अधिक नागरीकरण झालेले होते. भारताचा पूर्व भाग मात्र कमी नागरीकरण झालेला होता. भारतामध्ये ब्रिटिशांच्या काळात नागरीकरणाचे प्रमाण केवळ ११ टक्के होते. वाराणसी हे त्या काळातील भारतातील सर्वात मोठे शहर होते. या नंतर कलकत्ता, सुरत, पटना, मद्रास, मुंबई व दिल्ली असा शहरांचा क्रम होता. या शहरांपैकी कलकत्ता आणि मद्रास ही शहरे ब्रिटिशांनी वसलेली होती. इतर शहरे मात्र मोगल काळापासून किंवा त्या अगोदर च्या काळापासून अस्तित्वात होती. ब्रिटीशांच्या कालखंडामध्ये ब्रिटिश पूर्व शहरांना उतरती कळा लागल्याचे दिसते. यामध्ये आगरा, लखनऊ, अलहाबाद, श्रीनगर, पाटणा, गया, बडोदा, इंदोर, या शहरांचे महत्त्व हळूहळू कमी होत गेले. १८७२ मध्ये जेव्हा पहिल्यांदा जनगणना झाली तेव्हा नागरी लोकसंख्या ११ टक्के वरून ८.७ टक्के वर आली, म्हणजे नागरी लोकसंख्या दोन ते तीन टक्क्याने कमी झाल्याचे दिसते या जनगणनेच्या वेळी एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली भारतात १६ शहरे होती, व ४३ नगरे होती की, ज्यांची लोकसंख्या ५० हजारांपेक्षा जास्त व एक लाखापेक्षा कमी होती. त्यावेळी भारतातील सर्वात मोठे शहर कलकत्ता हे होते. कलकत्याची लोकसंख्या तेव्हा आठ लाखाच्या आसपास होती. ब्रिटिशांच्या कालखंडामध्ये जुन्या शहरांची लोकसंख्या कमी झाली मात्र ब्रिटिशांनी वसवलेल्या शहरांची लोकसंख्या झपाट्याने वाढल्याचे दिसून येते. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील पारंपारिक हस्तकलेच्या उद्योगांकडे पाहण्याचा ब्रिटीशांचा नकारात्मक दृष्टिकोन होय. भारतातील कापड गिरण्यांचे महत्त्व इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर कमी झाले. इंग्लंडमधील मॅंचेस्टर या शहरांमध्ये कापड गिरण्यांची संख्या वाढल्यामुळे भारतीय कापूस इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात होत गेला त्यामुळे भारतातील कापड गिरण्या बंद पडून त्याचा नागरीकरणावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसते. १८५३ नंतर रेल्वेचे जाळे भारतात ब्रिटिशांनी हळूहळू पसरवले. त्यामुळे कलकत्ता, मद्रास, आणि मुंबई ही शहरे जोडली गेली. १९०१ च्या सुमारास ब्रिटिश लोक भारतात येऊन दीडशतक ओलांडल्यानंतर भारतात नागरीकरणाचे प्रमाण परत अकरा टक्क्यावर आले. १९०१ च्या जनगणनेनुसार भारतात एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या २५ तर ५० हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या ५९ झाली. या सुमारास भारतात जवळजवळ १९१७ लहान–मोठी शहरे होती. इसवी सन १९४१ च्या जनगणनेनुसार भारतात एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या ४९ इतकी होती. व त्या वेळी संपूर्ण देशात मिळून जवळजवळ २५०० लहान मोठी शहरे व नगरे होती. ब्रिटिशांच्या एकशे पन्नास वर्षांच्या

सत्ताकाळात भारताच्या नागरीकरणात महत्त्वपूर्ण परिवर्तन घडून आले. ब्रिटिश कालखंडामध्ये तीन मोठ्या बंदर शहरांची निर्मिती झाली. हिमालयाच्या पायथ्याशी अनेक थंड हवेच्या नगरांची स्थापना ब्रिटीशांनी केली. दक्षिणेतील चहा व कॉफीच्या मळयांची लागवड, भारतातील काही शहरांचे नागरी व सैनिकी शहरे असे विभाजन, रेल्वे व आधुनिक उद्योगधंद्यांच्या स्थापनेमुळे जमशेदपूर, धनबाद, आणि असंसोल यासारख्या औद्योगिक शहरांची निर्मिती, नागरी सुविधा व नागरिक प्रशासनामध्ये आमूलाग्र बदल, हे बदल ब्रिटीशांच्या कालखंडात घडून आले. विसाव्या शतकाच्या आरंभी कलकत्ता, मद्रास, आणि मुंबई ही शहरे भारतातील पुढारलेली शहरे बनली. परंतु या शहरांपैकी कोणत्याही शहराची लोकसंख्या त्यावेळी दहा लाखापर्यंत नव्हती. ब्रिटिश कालखंडात मोगलकालीन शहराचे महत्त्व कमी झाले, कलकत्ता, मद्रास, मुंबई ही प्रशासकीय व्यापारी व औद्योगिक दृष्ट्या पुढारलेली शहरे अस्तित्वात आली. त्यामुळे या शहरांमधील बांधकामेही युरोपियन शैलीची असल्याचे दिसून येते. १९११ मध्ये ब्रिटीशांनी आपली राजधानी दिल्ली येथे हलविली. त्यासाठी त्यांनी नवी दिल्ली या शहराची निर्मिती केली. शहरांमधील विविध प्रकारच्या सुविधा देण्याची जबाबदारी ब्रिटीशांनी नागरीसंस्थावर टाकली त्यामुळे ब्रिटीश कालखंडामध्ये शहरांचा विकास झपाटयाने झाला.

**५) स्वातंत्र्योत्तर कालखंड**

स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात भारतातील नागरीकरणाने एक महत्त्वाचा टप्पा पार केला. ब्रिटीश कालखंडात काही शहरांमध्ये लोकसंख्या वाढीचा दर कमी होता. परंतू भारत स्वतंत्र झाल्यावर देशातील सर्वच भागात नागरीकरणाची गती वाढलेली दिसते. एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या संख्येत झपाटयाने वाढ झाल्याचे दिसते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात नागरीकरणाची वाढ तीन पट होती. इ. स. १९५१ मध्ये ६२ दशलक्ष असलेली नागरी लोकसंख्या १९८१ पर्यंत १५९ दशलक्ष झाली. दशलक्षी शहरांची संख्या ४ वरून १२ वर गेली. स्वातंत्र्यानंतरच्या काळातील भारताच्या नागरीकीकरणात काही प्रमुख बदल झाले त्यामधे देशाच्या फाळणीनंतर निर्वासीतांच्या लोंढयामुळे अनेक वसाहतींची स्थापना झाली पूर्व पाकीस्तानातून आलेल्या लोकांचे पुर्नवसन कोलकत्ता शहराच्या तसेच देशाच्या पूर्व भागात झाले तर पश्चिम पाकीस्तानातून आलेल्या लोकांसाठी पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागात वसाहती स्थापन कराव्या लागल्या. नवीन प्रशासकीय शहरांची निर्मिती करण्यात आली. नवीन औद्योगिक शहरांची स्थापना जुन्या शहरांजवळ झाली. एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची झपाटयाने वाढ झाली. नगर नियोजनास सुरूवात झाल्याने नागरी सुविधांमध्ये वाढ झाली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भाषावार प्रांत रचना झाली त्यामुळे अनेक नवीन राज्य अस्तित्वात आली, त्यामुळे या राज्यांच्या कारभारासाठी नवीन राजधान्यांची शहरे निर्माण करावी लागली. तसेच चंदीगड, भुवनेश्वर, गांधीनगर या सारखी नियोजीत शहरे वसविण्यात आली. औद्योगिक विकासामुळे रूरकेला, दुर्गापूर, भिलाई, बोकारो, बरोनी, हाल्दीया, अंकलेश्वर, शिंद्री, भिवापूर, नयानांगल, कांडला, नवी मुंबई, अशी अनेक शहरे विकसीत झाली. १९५१ मध्ये २८४४ इतकी नगरे होती ती २०११ सालापर्यंत ७९३५ इतकी झाली असल्याचे दिसून येते.

## भारतातील नागरिकीकरणाचा कल


भारतामध्ये १९०१ पासून २०११ पर्यंतच्या नागरिकीकरणाच्या दशवार्षिक टक्केवारीचा आढावा घेतला असे दिसून येते की १९०१ पासून लोकसंख्येमध्ये सात्यत्याने वाढ झाल्यामुळे ग्रामिण भागातून शहरी भागात झालेल्या स्थलांतरामुळे शहरी लोकसंख्येमध्ये झपाट्याने वाढ झाली. १९०१ पासून १९३१ पर्यंत नागरीकरणाचा दर हा मंद होता. १९४१ साली २.७७ टक्के नागरीकरणात वाढ झाली. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतरच्या १९५१ जनगणनेमध्ये पहिल्यांदा नागरी लोकसंख्येचे प्रमाण ३.४७ टक्के सर्वाधिक वाढले असल्याचे दिसून येते. देश स्वतंत्र झाल्यानंतरच्या फाळणीचा तसेच ग्रामिण भागातून शहरी भागाकडे झालेल्या स्थलांतराचा हा परिणाम असल्याचे दिसून येते. त्यानंतर १९६१ साली त्यामध्ये घट होऊन हे प्रमाण २.३४ टक्के इतके झाले. त्यानंतर १९७१ च्या जनणनेत ३.२३ असलेला लोकसंख्या वाढीचा दर १९८१ मध्ये सर्वाधिक म्हणजे ३.७९ टक्के होता. त्यानंतर मात्र भारताच्या नागरीकरणात सातत्याने वाढ होत असली तरी दशवार्षिक वाढ ही कमी कमी झाल्याचे दिसते.

**तक्ता १ . — भारतातील नागरी लोकसंख्येची टक्केवारी**

| अ. नं. | एकूण लोकसंख्या | नागरी लोकसंख्या | नागरी लोकसंख्येची टक्केवारी | नागरी लोकसंख्येतील दश वार्षिक वाढ टक्केवारीत |
|---|---|---|---|---|
| **१९०१** | २३८.३ | २५.८ | १०.८३ | —— |
| **१९११** | २५२.१ | २५.९ | १०.२७ | ०.०३ |
| **१९२१** | २५१.३ | २८.१ | ११.१८ | ०.७९ |
| **१९३१** | २७८.९ | ३३.५ | १२.०१ | १.७५ |
| **१९४१** | ३१८.६ | ४४.२ | १३.८७ | २.७७ |
| **१९५१** | ३६१.० | ६२.४ | १७.२९ | ३.४७ |
| **१९६१** | ४३९.२ | ७८.९ | १७.९६ | २.३४ |
| **१९७१** | ५४८.१ | १०९.१ | १९.९१ | ३.२३ |
| **१९८१** | ६८३.३ | १५९.४ | २३.३३ | ३.७९ |
| **१९९१** | ८४६.३ | २१७.६ | २५.७१ | ३.११ |
| **२००१** | १०२७.१ | २८५.४ | २७.७८ | २.७४ |
| **२०११** | १२१०.२ | ३७७.१ | ३१.१६ | २.७६ |

**स्त्रोत — जनगणना अहवाहल १९०१ ते २०११**

**आलेख क्रमांक १. – भारत : शहरी आणि ग्रामीण लोकसंख्या दशलक्षामध्ये**




| | 1901 | 1911 | 1921 | 1931 | 1941 | 1951 | 1961 | 1971 | 1981 | 1991 | 2001 | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नागरी लोकसंख्या | 25.8 | 25.9 | 28.1 | 33.5 | 44.2 | 62.4 | 78.9 | 109.1 | 159.4 | 217.6 | 285.4 | 377.1 |
| एकूण लोकसंख्या | 238.3 | 252.1 | 251.3 | 279.9 | 318.6 | 361.1 | 439.2 | 548.1 | 683.3 | 846.3 | 1027.1 | 1210.2 |

**स्त्रोत – भारतीय जनगणना अहवाल २०११**

तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे नागरी लोकसंख्येची टक्केवारी मध्ये झालेल्या वाढीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, १९०१ पासून नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीत १९०१ पासून सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येते. पहिल्या टप्प्यामध्ये १९४१ पर्यंत ही वाढ कमी होती परंतू भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर १९५१ नंतर त्यामध्ये सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येते. एकूण लोकसंख्येशी तुलना केली असता १९८१ साली नागरिकीकरणामध्ये सर्वाधिक वाढ होऊन नागरी लोकसंख्येचे प्रमाण २३.३३ पर्यंत गेले. त्यानंतर १९९१ साली हे प्रमाण २५.७१ टक्के, २००१ साली २७.७८ टक्के तर २०११ साली भारताच्या नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण ३१.१६ टक्के झाल्याचे दिसून येते. २०२१ सालापर्यंत भारताची नागरी लोकसंख्या ५३ कोटीहून अधिक होऊन एकूण नागरी लोकसंख्येची टक्केवारी ४५ टक्क्याहून अधिक होईल असे लोकसंख्यातज्ञांचे मत आहे.

## भारतातील नागरीकरण २०११

भारतामध्ये २०११ च्या जनगणना अहवालानुसार २८ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासीत/संघराज्य होती. या २०११मध्ये झालेल्या जनगणनेस जवळजवळ १० वर्षाचा कालावधी झालेला आहे. परंतू लोकसंख्या, नागरीकरण यासाठी जी आकडेवारी प्रमाण मानली जाते ती म्हणजे जनगणना अहवाल होय. त्यामुळे २०२१ मधील जनगणना अहवाल जोपर्यंत येत नाही तो पर्यंत २०११ च्या जनगणना अहवालामधील सांख्यिकी माहितीच प्रमाण मानावी लागेल. २०११ च्या जनगणना अहवालातील विविध घटकांचे पृथ्थकरण करून भारताच्या आणि महाराष्ट्राच्या नागरीकरणाच्या संदर्भात विश्लेषण करण्यात आले आहे. २०२१ च्या जनगणना अहवालाचे आकडे जेव्हा समोर येतील तेव्हा त्यामध्ये खूप मोठया प्रमाणात बदल झालेला आहे. लोकसंख्येच्या संदर्भात जी भाकीते केली जातात त्यानुसार भारताची लोकसंख्या २०२१ मध्ये १५० कोटीच्या आसपास असेल आणि नागरीकरणाची पातळी ५० टक्क्याच्या आसपास गेलेली असेल.

**तक्ता – भारतातील नागरी आणि ग्रामीण लोकसंख्या विभागणी टक्केवारी – २०११**

| अ. नं. | घटक/संघ राज्य | लोकसंख्या २०११ | ग्रामीण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या % | शहरी लोकसंख्या % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आंध्रप्रदेश | 84,665,533 | 56,311,788 | 28,353,745 | 66.5 | 33.5 |
| 2 | अरूणाचल प्रदेश | 1,382,611 | 1,069,165 | 313,446 | 77.3 | 22.7 |
| 3 | आसाम | 31,169,272 | 26,780,526 | 4,388,746 | 86 | 14 |
| 4 | अंदमान निकोबार | 379,944 | 244,411 | 135,533 | 64.3 | 35.7 |
| 5 | बिहार | 103,804,637 | 92,075,028 | 11,729,609 | 88.7 | 11.3 |
| 6 | छत्तीसगड | 25,540,196 | 19,603,658 | 5,936,538 | 76.8 | 23.2 |
| 7 | चंदीगड | 1,054,686 | 29,004 | 1,025,682 | 2.7 | 97.3 |
| 8 | दादरा नगर हवेली | 342,853 | 183,024 | 159,829 | 53.4 | 46.6 |
| 9 | दमण दीव | 242,911 | 60,331 | 182,580 | 24.8 | 75.2 |
| 10 | दिल्ली | 16,753,235 | 419,319 | 16,333,916 | 2.5 | 97.5 |
| 11 | गोवा | 1,457,723 | 551,414 | 906,309 | 37.8 | 62.2 |
| 12 | गुजराथ | 60,383,628 | 34,670,817 | 25,712,811 | 57.4 | 42.6 |
| 13 | हरियाणा | 25,353,081 | 16,531,493 | 8,821,588 | 65.2 | 34.8 |
| 14 | हिमाचल | 6,856,509 | 6,167,805 | 688,704 | 89.9 | 10.1 |
| 15 | जम्मू काशिमर | 12,548,926 | 9,134,820 | 3,414,106 | 72.8 | 27.2 |
| 16 | झारखंड | 32,966,238 | 25,036,946 | 7,929,292 | 76 | 24 |
| 17 | कर्नाटक | 61,130,704 | 37,552,529 | 23,578,175 | 61.4 | 38.6 |
| 18 | केरळ | 33,387,677 | 17,445,506 | 15,942,171 | 52.3 | 47.7 |
| 19 | लक्षद्विप | 64,429 | 14,121 | 50,308 | 22 | 78 |
| 20 | मध्यप्रदेश | 72,597,565 | 52,537,899 | 20,059,666 | 72.4 | 27.6 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 21 | महाराष्ट्र | 112,372,972 | 61,545,441 | 50,827,531 | 54.8 | 45.2 |
| 22 | मणिपूर | 2,721,756 | 1,899,624 | 822,132 | 69.8 | 30.2 |
| 23 | मेघालय | 2,964,007 | 2,368,971 | 595,036 | 79.9 | 20.1 |
| 24 | मिझोराम | 1,091,014 | 529,037 | 561,977 | 48.5 | 51.5 |
| 25 | नागालॅंड | 1,980,602 | 1,406,861 | 573,741 | 71 | 29 |
| 26 | ओरिसा | 41,947,358 | 34,951,234 | 6,996,124 | 83.3 | 16.7 |
| 27 | पंजाब | 27,704,236 | 17,316,800 | 10,387,436 | 62.5 | 37.5 |
| 28 | पॉंडेचरी | 1,244,464 | 394,341 | 850,123 | 31.7 | 68.3 |
| 29 | राज्यस्थान | 68,621,012 | 51,540,236 | 17,080,776 | 75.1 | 24.9 |
| 30 | सिक्कीम | 607,688 | 455,962 | 151,726 | 75 | 25 |
| 31 | तमिळनाडू | 72,138,958 | 37,189,229 | 34,949,729 | 51.6 | 48.4 |
| 32 | त्रिपुरा | 3,671,032 | 2,710,051 | 960,981 | 73.8 | 16.2 |
| 33 | उत्तरप्रदेश | 199581477 | 155111022 | 44470455 | 77.7 | 22.3 |
| 34 | उत्तराखंड | 10,116,752 | 7,025,583 | 3,091,169 | 69.4 | 30.6 |
| 35 | पश्चिम बंगाल | 91,347,736 | 62,213,676 | 29,134,060 | 68.1 | 31.9 |
| | एकुण | **1,210,193,422** | **833,087,662** | **377,105,760** | **68.8** | **31.2** |

**स्त्रोत – भारतीय जनगणना अहवाल २०११**

## भारतातील शहरी लोकसंख्येची टक्केवारी २०११

२०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतातील शहरी लोकसंख्या ३७,७१,०५,७६० इतकी आहे. एकूण लोकसंख्येशी शहरी लोकसंख्येची टक्केवारी ३१.२ टक्के आहे. भारतातील घटकराज्य आणि केंद्रशासीत प्रदेशांमध्ये नागरी लोकसंख्येमध्ये प्रचंड तफावत आढळून येते. किंबहुना केंद्रशासीत प्रदेशातील नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण सर्वाधिक आहे. राज्यांमध्येही नागरी लोकसंख्येमध्ये मोठया प्रमाणात विषमता आढळून येते. नागरी लोकसंख्येचे तीन गटात विभाजन केल्यास पुढील प्रमाणे

**अ) ५० टक्क्याहून अधिक नागरी लोकसंख्या**

भारतामध्ये ५० टक्क्याहून अधिक नागरी लोकसंख्या असलेली एकूण घटकराज्य दोन आहेत. यामध्ये सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य गोवा हे असून एकूण लोकसंख्येशी नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण ६२.२ टक्के आहे. दुसरे राज्य मिझोराम असून ५१.५ टक्के नागरी लोकसंख्या आहे. यानंतर केंद्रशासीत प्रदेशांमध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण दिल्ली (९७.५), चंदीगड (९७.३), लक्षद्विप (७८), दमण दीव (७५.२), आणि पॉंडेचरी (६८.३) असे क्रमांक आहेत.

**ब) २५ ते ४९.९९ टक्के नागरी लोकसंख्या**

२५ ते ४९.९९ टक्क्यांच्या दरम्यान शहरी लोकसंख्या असलेली घटक राज्य आणि केंद्रशासीत प्रदेश अनुक्रमे पुढील प्रमाणे तमिळनाडू (४८.४), केरळ (४७.७), महाराष्ट्र ४५.२०, गुजराथ ४२.६, कर्नाटक ३८.६, पंजाब ३७.५, हरियाणा ३४.८, आंध्रप्रदेश ३३.५, पश्चिम बंगाल ३१.९, उत्तराखंड ३०.६, मणिपूर ३०.२,

नागालॅंड २९, मध्यप्रदेश २७.६, जम्मू काश्मिर २७.२, सिक्कीम २५, तर केंद्रशासीत प्रदेशांपैकी दादरा नगर हवेली ४६.६०, आणि अंदमान निकोबार ३५.७ अशी १५ राज्य आणि दोन केंद्रशासीत प्रदेशांची शहरी लोकसंख्या २५ टक्क्याहून अधिक आणि ५० टक्क्याहून कमी आहे.

**क) २४.९९ टक्क्याहून कमी नागरी लोकसंख्या**

२५ टक्क्याहून कमी नागरी लोकसंख्या असलेली राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेश पुढील प्रमाणे राज्यस्थान २४.९, झारखंड २४, छत्तीसगड २३.२, अरूणाचलप्रदेश २२.७, उत्तरप्रदेश २२.३, मेघालय २०.१, ओरिसा १६.७, त्रिपूरा १६.२, आसाम १४, बिहार ११.३, आणि हिमाचल प्रदेश १०.१. भारतामध्ये २५ टक्क्याहून कमी नागरीकरण झालेली एकूण १२ राज्य आहेत यामध्ये एकही केंद्रशासीत प्रदेश नाही.

## नागरी लोकसंख्या सर्वाधिक असलेली पाच राज्य

**तक्ता क्र — भारतातील शहरी लोकसंख्या अधिक असलेली पहिली सहा राज्य २०११**

| अ.नं. | राज्य | लोकसंख्या २०११ | ग्रामीण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या % | शहरी लोकसंख्या % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गोवा | 1,457,723 | 551,414 | 906,309 | **37.8** | **62.2** |
| 2 | मिझोराम | 1,091,014 | 529,037 | 561,977 | **48.5** | **51.5** |
| 3 | तमिळनाडू | 72,138,958 | 37,189,229 | 34,949,729 | **51.6** | **48.4** |
| 4 | केरळ | 33,387,677 | 17,445,506 | 15,942,171 | **52.3** | **47.7** |
| 5 | महाराष्ट्र | 112,372,972 | 61,545,441 | 50,827,531 | **54.8** | **45.2** |

**स्त्रोत — भारतीय जनगणना अहवाल २०११**

भारतामध्ये २०११ जनगणना अहवालानुसार सर्वाधिक नागरी लोकसंख्या असलेली प्रमुख पाच राज्यामध्ये गोवा हे राज्य प्रथम आहे. गोव्यामध्ये नागरी लोकसंख्या ९,०६,३०९ इतकी असून शेकडा प्रमाण ६२.२ टक्के इतके आहे. दुसऱ्या क्रमांकावर मिझोराम हे राज्य असून नागरी लोकसंख्या ५६१९७७ असून शेकडा प्रमाण ५१.५ टक्के आहे. नागरी लोकसंख्या ५० टक्क्याहून अधिक असलेली गोवा आणि मिझोराम ही दोन छोटी राज्य आहेत. तिसऱ्या क्रमांकावर तमिळनाडू हे राज्य असून तमिळनाडूची एकून नागरी लोकसंख्या ३,४९,४९,७२९ इतकी असून शेकडा प्रमाण ४८.४ टक्के आहे. चौथ्या क्रमांकावर केरळ हे राज्य असून नागरी लोकसंख्या १,५९,४२,१७१ इतकी असून शेकडा ४७.७ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते. पाचव्या क्रमांकावर महराष्ट्र राज्य असून महाराष्ट्राची ५,०८,२७,५३१ एवढी लोकसंख्या नागरी भागात राहत असून शेकडा प्रमाण ४५.२ इतके आहे. महाराष्ट्रामध्ये शेकडा प्रमाण जरी कमी असले तरी एकूण लोकसंख्येशी तुलना करता सर्वाधिक ५ कोटीहून अधिक लोकसंख्या नागरी भागात राहत असल्याचे दिसते. भारतातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी १३.१५ टक्के नागरी लोकसंख्या फक्त महाराष्ट्र या राज्यामध्ये आढळून येते. एकूण नागरी लोकसंख्येच्या संदर्भात भारतामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे.

## नागरी लोकसंख्या सर्वाधिक कमी असलेली पाच राज्य

**तक्ता क्र – भारतातील शहरी लोकसंख्या कमी असलेली पहिली पाच राज्य २०११**

| अ.नं. | राज्य | लोकसंख्या २०११ | ग्रामीण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या % | शहरी लोकसंख्या % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | हिमाचल | 6,856,509 | 6,167,805 | 688,704 | 89.9 | 10.1 |
| 2 | बिहार | 103,804,637 | 92,075,028 | 11,729,609 | 88.7 | 11.3 |
| 3 | आसाम | 31,169,272 | 26,780,526 | 4,388,746 | 86 | 14 |
| 4 | त्रिपुरा | 3,671,032 | 2,710,051 | 960,981 | 73.8 | 16.2 |
| 5 | ओरिसा | 41,947,358 | 34,951,234 | 6,996,124 | 83.3 | 16.7 |

**स्त्रोत – भारतीय जनगणना अहवाल २०११**

भारतामध्ये हिमाचल प्रदेश १०.१, बिहार ११.३, आसाम १४, त्रिपुरा १६.२ आणि ओडीशा १६.७ टक्के अशी नागरी लोकसंख्या सर्वाधिक कमी असलेली पाच राज्य आहेत. भौगोलिक परिस्थिती आणि औद्योगिकरणाचा अभाव यामुळे या राज्यांमध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

## संघराज्यातील (केंद्रशासीत प्रदेश) नागरी लोकसंख्येचे प्रमाण


भारतातील १/१ नुसार संघराज्याचा दर्जा मिळालेले ७ प्रदेश आहेत त्यामध्ये दिल्ली हा केंद्रशासीत प्रदेश असून देशाच्या राजधानीचे ठिकाण आहे. दिल्ली या शहराचे नागरी लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९७.५ टक्के इतके आहे. त्यानंतर चंदीगड हे पंजाब आणि हरियानाच्या राजधानीचे शहर असलेले चंदीगड हे शहर संघराज्याचा दर्जा मिळालेले असून नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण ९७.३ टक्के आहे. त्याखालोखाल लक्षद्विप ७८, दमण आणि दीव ७५.२ आणि पॉडेचरी ६८.३ टक्के नागरी लोकसंख्या आहे. उर्वरित दादरा नगर हवेली आणि अंदमान निकोबार या केंद्रशासीत प्रदेशांमध्ये ४६.६० आणि ३५.७ एवढे नागरी लोकसंख्येचे प्रमाण आहे.

**तक्ता क्र – भारतातील शहरी लोकसंख्या सर्वाधिक असलेले केंद्रशाशीत प्रदेश २०११**

| अ.नं. | राज्य | लोकसंख्या २०११ | ग्रामीण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या % | शहरी लोकसंख्या % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | दिल्ली | 16,753,235 | 419,319 | 16,333,916 | 2.5 | 97.5 |
| 2 | चंदीगड | 1,054,686 | 29,004 | 1,025,682 | 2.7 | 97.3 |
| 3 | लक्षद्विप | 64,429 | 14,121 | 50,308 | 22 | 78 |
| 4 | दमण दीव | 242,911 | 60,331 | 182,580 | 24.8 | 75.2 |
| 5 | पॉडेचरी | 1,244,464 | 394,341 | 850,123 | 31.7 | 68.3 |


**स्त्रोत – भारतीय जनगणना अहवाल २०११**

नकाशा – भारतातील नागरी लोकसंख्येचे वितरण २००१





स्त्रोत – भारतीय जनगणना अहवाल विश्लेषण अहवाल २०११

## आलेख – भारतातील नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण २०११



नकाशा – भारतातील नागरी लोकसंख्येचे वितरण २०११




स्रोत – भारतीय जनगणना अहवाल विश्लेषण अहवाल २०११

# भारतातील नगारी विभाग

खालील सारणीमध्ये भारतातील १ लक्ष लोकसंख्या आणि दहा लक्ष लोकसंख्या असलेल्या १९०१ पासून २०११ च्या जनगणना वर्षापर्यंत आढावा घेण्यात आलेला आहे. १९०१ साली भारतामध्ये एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेली २४ शहरे होती तर दहा लाख लोकसंख्या असलेले कलकत्ता हे एकमेव शहर होते. १९११ पासून १९४१ पर्यंत एक लाखाहून अधिक लोकसंख्य असलेल्या नगरांची संख्या ४७ पर्यंत वाढली तर दशलक्षी शहरे फक्त कलकत्ता आणि मुंबई ही दोनच शहरे होती. १९५१ मध्ये त्यामध्ये भर पडून दिल्ली, चेन्नई आणि हैद्राबाद अशी पाच दशलक्षी शहरे आणि ७१ एकलक्षी शहरे भारतामध्ये अस्तित्वात होती.

**तक्ता क्र. २. – भारतातील १ लाख आणि दशलक्षी शहरांची एकूण संख्या**

| अ. नं. | नगरे | १ लाखाहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे | १० लाखाहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे |
|---|---|---|---|
| १९०१ | १८२७ | २४ | १ |
| १९११ | १८१५ | २१ | २ |
| १९२१ | १९४९ | २७ | २ |
| १९३१ | २०७२ | ३३ | २ |
| १९४१ | २२५० | ४७ | २ |
| १९५१ | २८४३ | ७१ | ५ |
| १९६१ | २३६५ | ९५ | ७ |
| १९७१ | २५९० | १३९ | ९ |
| १९८१ | ३३७८ | २०४ | १२ |
| १९९१ | ४६८९ | २७३ | २३ |
| २००१ | ५१६१ | ३५० | ३५ |
| २०११ | ७९३५ | ४६८ | ५२ |

**स्त्रोत – जनगणना अहवाहल १९०१ ते २०११**

तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भारताच्या नागरी लोकसंख्येमध्ये १९६१ नंतर कमालीची वाढ होऊन १९६१ मध्ये अहमदाबाद, बुर्हार आणि बंगलोर या तीन शहरांची लोकसंख्या दहा लाखाहून अधिक झाली. १९७१ मध्ये कानपूर आणि पुणे शहरांची दशलक्षी शहरांमध्ये भर पडली आणि एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या १३९ झाली. १९८१ मध्ये नागपूर, लखनौ, आणि जयपूर या शहरांची त्यामध्ये भर पडून एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या २०४ इतकी झाली. १९९१ मध्ये एकलक्षी शहरांची संख्या २७३ इतकी झाली तर अकरा नवीन दशलक्षी शहरांची त्यामध्ये भर पडली त्यामध्ये सुरत, कोईम्बतूर, पटणा, मदुराई, इंदोर, कोची, वाराणसी, वडोदरा, जबलपूर, आग्रा, धनबाद, ही शहरे दशलक्षी शहरे झाली. भोपाळ, लुधियाना, विशाखापट्टणम्, मिरत, नाशिक, जमशेदपूर, असणसोल, फरीदाबाद, विजयवाडा, अमृतसर, राजकोट, श्रीनगर, गाजीयाबाद, भिलाई या शहरांची २००१ च्या जनगणनेत दशलक्षी शहरे म्हणून भर

पडली. तर एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या ३५० इतकी झाली, तर जनगणना शहरांचा दर्जा मिळालेल्या नगरांची संख्या ५१६१ पर्यंत पोहचली. २०११ च्या जनगणना अहवालानुसार नगरांचा दर्जा मिळालेली शहरे ७९३४, एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या ४६८ तर दशलक्षी शहरांची संख्या ५३ पर्यंत पोहचली. २०११ च्या जनगणना अहवालासंदर्भात सविस्तर माहिती सविस्तर पुढे देण्यात आली आहे.

## भारतातील नागरिकीकरणाचे २०११ च्या जनगणना अहवालानुसार विश्लेषण

**तक्ता ३. – भारत दशलक्षी शहरे लोकसंख्या लिंग गुणोत्तर आणि साक्षरता – २०११**

| अ.नं. | दशलक्षी शहराचे नाव | राज्य | लोकसंख्या | शहर/उपनगर लोकसंख्या | लिंग गुणोत्तर | साक्षरता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | महाराष्ट्र | 12,442,373 | 18,414,288 | 853 | 89.73 |
| 2 | दिल्ली | दिल्ली | 11,034,555 | 16,314,838 | 876 | 87.59 |
| 3 | कोलकाता | पश्चिम बंगाल | 4,496,694 | 14,112,536 | 908 | 86.31 |
| 4 | चेन्नई | तामिळनाडू | 4,646,732 | 8,696,010 | 989 | 90.18 |
| 5 | बंगळुरू | कर्नाटक | 8,443,675 | 8,499,399 | 923 | 88.71 |
| 6 | हैदराबाद | आंध्र प्रदेश | 6,731,790 | 7,749,334 | 955 | 83.26 |
| 7 | अहमदाबाद | गुजरात | 5,577,940 | 6,352,254 | 898 | 88.29 |
| 8 | पुणे | महाराष्ट्र | 3,124,458 | 5,049,968 | 948 | 89.56 |
| 9 | सुरत | गुजरात | 4,467,797 | 4,585,367 | 756 | 87.89 |
| 10 | जयपूर | राजस्थान | 3,046,163 | 3,046,163 | 900 | 83.33 |
| 11 | कानपूर | उत्तर प्रदेश | 2,765,348 | 2,920,067 | 857 | 82.42 |
| 12 | लखनौ | उत्तर प्रदेश | 2,817,105 | 2,901,474 | 928 | 82.5 |
| 13 | नागपूर | महाराष्ट्र | 2,405,665 | 2,497,777 | 963 | 91.92 |
| 14 | गाझियाबाद | उत्तर प्रदेश | 1,648,643 | 2,358,525 | 885 | 84.78 |
| 15 | इंदूर | मध्य प्रदेश | 1,964,086 | 2,167,447 | 925 | 85.87 |
| 16 | कोयंबटूर | तामिळनाडू | 1,050,721 | 2,151,466 | 997 | 91.3 |
| 17 | कोची | केरळा | 602,046 | 2,117,990 | 1027 | 97.36 |
| 18 | पटना | बिहार | 1,684,222 | 2,046,652 | 885 | 83.37 |
| 19 | भोपाळ | मध्य प्रदेश | 1,798,218 | 1,883,381 | 921 | 83.47 |
| 20 | ठाणे | महाराष्ट्र | 1,841,488 | 1,841,488 | 888 | 89.41 |
| 21 | वडोदरा | गुजरात | 1,670,806 | 1,817,191 | 921 | 90.63 |
| 22 | आग्रा | उत्तर प्रदेश | 1,585,704 | 1,746,467 | 875 | 73.11 |
| 23 | विशाखापट्टणम | आंध्र प्रदेश | 1,728,128 | 1,728,128 | 978 | 81.79 |
| 24 | पिंपरी आणि चिंचवड | महाराष्ट्र | 1,727,692 | 1,727,692 | 833 | 89.22 |
| 25 | तिरुवनंतपुरम | केरळ | 743,691 | 1,687,406 | 1054 | 95.1 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 26 | लुधियाना | पंजाब | 1,618,879 | 1,618,879 | 850 | 85.77 |
| 27 | नाशिक | महाराष्ट्र | 1,486,053 | 1,562,769 | 899 | 89.85 |
| 28 | विजयवाडा | आंध्र प्रदेश | 1,034,358 | 1,491,202 | 995 | 81.24 |
| 29 | मदुराई | तामिळनाडू | 1,017,865 | 1,462,420 | 999 | 90.91 |
| 30 | वाराणसी | उत्तर प्रदेश | 1,198,491 | 1,435,113 | 887 | 79.27 |
| 31 | मेरठ | उत्तर प्रदेश | 1,305,429 | 1,424,908 | 897 | 75.66 |
| 32 | फरीदाबाद | हरियाणा | 1,414,050 | 1,414,050 | 874 | 83.83 |
| 33 | राजकोट | गुजरात | 1,286,678 | 1,390,933 | 908 | 87.8 |
| 34 | जमशेदपूर | झारखंड | 631,364 | 1,337,131 | 920 | 86.91 |
| 35 | श्रीनगर | जम्मू—काश्मीर | 1,180,570 | 1,273,312 | 908 | 69.15 |
| 36 | जबलपूर | मध्य प्रदेश | 1,055,525 | 1,267,564 | 935 | 87.39 |
| 37 | कल्याण आणि डोंबिवली | महाराष्ट्र | 1,247,327 | 1,247,327 | 920 | 91.37 |
| 38 | आसनसोल | पश्चिम बंगाल | 563,917 | 1,243,008 | 929 | 83.3 |
| 39 | वसई विरार | महाराष्ट्र | 1,222,390 | 1,222,390 | 886 | 88.57 |
| 40 | अलाहाबाद | उत्तर प्रदेश | 1,112,544 | 1,216,719 | 853 | 84.76 |
| 41 | धनबाद | झारखंड | 1,162,472 | 1,195,298 | 891 | 79.47 |
| 42 | औरंगाबाद | महाराष्ट्र | 1,175,116 | 1,189,376 | 929 | 87.49 |
| 43 | अमृतसर | पंजाब | 1,132,383 | 1,183,705 | 884 | 84.19 |
| 44 | जोधपूर | राजस्थान | 1,033,756 | 1,137,815 | 903 | 80.81 |
| 45 | रांची | झारखंड | 1,073,427 | 1,126,741 | 921 | 87.37 |
| 46 | रायपूर | छत्तीसगड | 1,010,433 | 1,122,555 | 948 | 85.95 |
| 47 | नवी मुंबई | महाराष्ट्र | 1,120,547 | 1,120,547 | 837 | 89.62 |
| 48 | ग्वाल्हेर | मध्य प्रदेश | 1,069,276 | 1,101,981 | 879 | 84.14 |
| 49 | हावरा | पश्चिम बंगाल | 1,077,075 | 1,077,075 | 919 | 88.71 |
| 50 | चंदीगड | चंदीगड | 961,587 | 1,025,682 | 829 | 86.42 |
| 51 | तिरुचिरापल्ली | तामिळनाडू | 847,387 | 1,021,717 | 1025 | 91.38 |
| 52 | कोटा | राजस्थान | 1,001,694 | 1,001,694 | 895 | 82.8 |

**स्त्रोत — भारतीय जनगणना अहवाल २०११**

## भारतातील २०११ च्या जनगणना अहवालानुसार दशलक्षी शहरांचे विश्लेषण

वरील तक्त्यामध्ये भारतातील दशलक्षी शहरे व त्यांची लोकसंख्या यांची माहिती दिलेली आहे. २०११ च्या जनगणने अहवालानुसार भारतामध्ये एकूण ५८ दशलक्षी शहरे आहेत. त्यापैकी मुंबई (१२,४४२,३७३) या शहराची लोकसंख्या सर्वाधिक आहे. ही फक्त मुंबई शहराचे लोकसंख्या आहे मुंबई शहर आणि उपनगर यांची लोकसंख्या विचारात घेतली असता मुंबई शहराची लोकसंख्या १८,४१४,२२८ इतकी आहे. मुंबई खालोखाल भारताचे राजधानी असलेले शहर म्हणजे दिल्ली या शहराची लोकसंख्या

उपनगराच्या लोकसंख्य सह १६,३१४,८३८ इतकी आहे. तिसऱ्या क्रमांकावर पश्चिम बंगालमधील कोलकत्ता हे शहरासह कोलकत्ता आणि उपनगराची लोकसंख्या १४,११२,५३६ इतकी आहे. भारतातील मुंबई, दिल्ली आणि कोलकत्ता या शहरांची लोकसंख्या एक कोटीहून अधिक आहे. चौथ्या क्रमांकावर तमिळनाडूमधील चेन्नई हे शहर असून या शहराची लोकसंख्या ८६,९६,०१० इतकी आहे. पाचव्या क्रमांकावर कर्नाटक मधील बंगळुरू हे शहर याची लोकसंख्या ८४,९९,३९९ इतकी आहे. याशिवाय २०११ च्या जनगणना अहवालानुसार पन्नास लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आंध्र प्रदेशातील हैदराबाद (७७ लाख), गुजरातमधील अहमदाबाद (६३ लाख), आणि महाराष्ट्रातील पुणे (५० लाख), ही तीन शहरे आहेत. गुजरात मधील सुरत (४५.८५ लाख), राजस्थान मधील जयपुर (३०.४६ लाख), उत्तर प्रदेशातील कानपूर (२९.२० लाख), आणि लखनऊ (२९.०१ लाख), या शहरांची लोकसंख्या पंचवीस लाखाहून जास्त आणि ५० लाखांच्या दरम्यान आहे. महाराष्ट्रातील नागपूर या शहराची लोकसंख्या (२४.९७ लाख) इतकी आहे. २० लाख ते २५ लाख यादरम्यान लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये महाराष्ट्रातील नागपूर, उत्तर प्रदेशातील गाजियाबाद, मध्यप्रदेशातील इंदूर, तमिळनाडूमधील कोयमतुर, केरळमधील कोची आणि बिहार मधील पटना ही ६ शहरे आहेत. १५ ते २० लाखाच्या दरम्यान लोकसंख्या असलेली एकूण नऊ शहरे आहेत. यामध्ये मध्य प्रदेशातील भोपाळ, महाराष्ट्रातील ठाणे, पिंपरी चिंचवड आणि नाशिक, गुजरातमधील वडोदरा, उत्तर प्रदेशातील आग्रह आंध्र प्रदेशातील विशाखापटनम केरळमधील तिरुवनंतपुरम, पंजाब मधील लुधियाना ही होत. उर्वरित २५ शहरांची लोकसंख्या दहा ते पंधरा लाखाच्या दरम्यान आहे. या शहरांमध्ये अनुक्रमे विजयवाडा, मदुराई, वाराणसी, मेरट, फरीदाबाद, राजकोट, जमशेदपूर, श्रीनगर, जबलपूर, कल्याण–डोंबिवली, असंसोल, वसई विरार, अलाहाबाद, धनबाद, औरंगाबाद, अमृतसर, जोधपुर, रांची, रायपुर, नवी मुंबई, ग्वालेर, हावरा, चंदिगड, तिरुचिरापल्ली, आणि कोटा ही दशलक्षी शहरे आहेत.

**तक्ता क्रमांक – ४: भारतातील राज्यनिहाय दशलक्षी शहरांची संख्या २०११**

| अ. नं. | राज्य/केंद्रशाशीत प्रदेश | दशलक्षी शहरे | एकूण शहरे |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र | मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, पिंपरी आणि चिंचवड, नाशिक, कल्याण आणि डोंबिवली, वसई विरार, औरंगाबाद, नवी मुंबई | 10 |
| 2 | उत्तरप्रदेश | कानपूर, लखनौ, गाझियाबाद, आग्रा, वाराणसी, मेरठ, अलाहाबाद | 7 |
| 3 | केरळ | कोची, तिरुवनंतपुरम, त्रिशूर, मालापुरम, कोझीकोड कन्नूर, कोलम | 7 |
| 4 | तमिळनाडू | चेन्नई, कोयंबटूर, मदुराई, तिराचिरापल्ली | 4 |
| 5 | गुजरात | अहमदाबाद, सुरत, वडोदरा, राजकोट | 4 |
| 6 | मध्यप्रदेश | इंदूर, भोपाळ, जबलपूर, ग्वालेर | 4 |
| 7 | झारखंड | जमशेदपूर, धनबाद, रांची | 3 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | पश्चिम बंगाल | कोलकाता, आसनसोल, हावरा | 3 |
| 9 | आंध्र प्रदेश | हैदराबाद, विशाखापट्टणम, विजयवाडा | 3 |
| 10 | राज्यस्थान | जयपूर, जोधपूर, कोटा | 3 |
| 11 | पंजाब | लुधियाना, अमृतसर | 2 |
| 12 | छत्तीसगड | रायपूर, दुर्ग – भिलाई | 2 |
| 13 | कर्नाटक | बंगळुरू | 1 |
| 14 | बिहार, | पटना | 1 |
| 15 | दिल्ली | दिल्ली | 1 |
| 16 | हरियाना | फरीदाबाद | 1 |
| 17 | चंदीगड | चंदीगड | 1 |
| 18 | जम्मू – काश्मिर | श्रीनगर | 1 |
| | | | 58 |

**स्त्रोत – भारतीय जनगणना अहवाल २०११**

२०११ च्या जनगणने अहवालानुसार भारत एकूण ५८ दशलक्षी शहरे आहेत. यापैकी महाराष्ट्र मध्ये सर्वात जास्त दशलक्षी शहरे आहेत. २०११च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, कल्याण–डोंबिवली, वसई विरार, औरंगाबाद आणि नवी मुंबई या दहा शहरांची लोकसंख्या १० लाखाहून अधिक आहे. महाराष्ट्रा खालोखाल उत्तर प्रदेश आणि केरळ मध्ये प्रत्येकी सात दशलक्षी शहरे आहेत त्यापैकी उत्तरप्रदेशात कानपुर, लखनऊ, गाजियाबाद, आग्रा, वाराणसी, मेरठ आणि आलहाबाद तर केरळमध्ये कोची, तिरुवनंतपुरम, त्रिशूर, मालापुरम, कन्नूर, कोझिकोड आणि कन्नूर ही दशलक्षी शहरे आहेत. त्यानंतर तमिळनाडूमध्ये चेन्नई, कोईमतुर, मदुराई आणि तिरुचिरापल्ली, गुजरात मध्ये अहमदाबाद, सूरत, वडोदरा आणि राजकोट. तर मध्यप्रदेशात इंदूर, भोपाळ, जबलपूर, आणि ग्वालेर दशलक्षी शहरे आहेत. झारखंड पश्चिम बंगाल आंध्र प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये प्रत्येकी तीन तीन दशलक्षी शहरे आहेत. त्यापैकी झारखंडमध्ये जमशेदपूर, धनबाद आणि रांची. पश्चिम बंगालमध्ये कोलकत्ता ,असंनसोल आणि हावरा. आंध्रप्रदेशात हैदराबाद, विशाखापटनम् आणि विजयवाडा. तर राजस्थान मध्ये जयपूर, जोधपूर आणि कोटा ही दशलक्षी शहरे आहेत. पंजाब आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये अनुक्रमे लुधियाना आणि अमृतसर, तर रायपुर आणि भिलाई अशी दोन दोन दशलक्षी शहरे आहेत. यानंतर कर्नाटक मध्ये बंगळूर, बिहारमध्ये पाटना, दिल्लीमध्ये दिल्ली, हरियाणामध्ये फरीदाबाद, चंदिगड आणि जम्मू–काश्मीरमध्ये श्रीनगर अशी एकूण भारतामध्ये ५८ दशलक्षी शहरे आहेत.

## भारतातील नागरीकरणाची वैशिष्टये

१. सर्व नगरपालिका, महानगरपालिका, लष्करी वसाहती, छावण्यांच्या जागा यांचा समावेश भारतातील नागरी प्रदेशात करण्यात येतो

२. भारतामध्ये नागरी भाग म्हणून मान्यता मिळण्यासाठी किमान ५००० लोकसंख्या असावी तसेच आर्थिक कार्यानुसार एकूण कामगारांच्या ७५ टक्के कामगार बिगर शेती व्यवसायात गुंतलेले असावेत.

३. नागरी भागाची प्रति चौरस कि.मी.ला ४०० व्यक्ती किंवा त्यापेक्षा अधिक असावी.

४. भारतामध्ये लोकसंख्येच्या अधारे नागरी वसाहतीचे एकूण १ ते ६ प्रवर्ग तयार करण्यात आलेले आहेत.

५. युरोपातील मेसोपोटेमिया व इजिप्त मधील नाईल नदीच्या संस्कृतीप्रमाणेच भारताच्या नागरिककरण्याला देखील एक दीर्घकालीन इतिहास आहे.

६. भारतातील नागरीकरणाची सुरुवात सिंधू नदीच्या खोऱ्यात जवळ–जवळ ४५०० वर्षांपूर्वी झालेली दिसून येते.

७. भारतातील सध्याची शहरे उदा. वाराणसी, पाटणा, पाटलीपुत्र ही उत्तरेतील तर मदुराई, कांचीपुरम ही प्राचिन शहरे आहेत.

८. ब्रिटिश कालखंडामध्ये नागरीकरणाची भरभराट झाल्याचे दिसते. ब्रिटिश, पोर्तुगीजा, डच, आणि फ्रेंचांनी समुद्र किनारपट्टीच्या प्रदेशात बंदरांचा विकास केला.

९. १८७२ मध्ये जेव्हा पहिल्यांदा जनगणना झाली तेव्हा नागरी लोकसंख्या ११ टक्के वरून ८.७ टक्के वर आली, म्हणजे नागरी लोकसंख्या दोन ते तीन टक्क्याने कमी झाल्याचे दिसते.

१०.पहिल्या जनगणनेच्या वेळी एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली भारतात १६ शहरे होती, तसेच भारतातील सर्वात मोठे शहर कलकत्ता हे होते.

११.१९०१ च्या जनगणनेनुसार भारतात एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या २५ तर ५० हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या ५९ होती.

१२.भारत देश स्वतंत्र झाल्यावर देशातील सर्वच भागात नागरीकरणाची गती वाढलेली दिसते. स्वातंत्र्यानंतर लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या संख्येत झपाटयाने वाढ झाल्याचे दिसते.

१३. स्वातंत्र्यानंतरच्या काळात नागरीकरणाची वाढ तीन पट होती. इ. स. १९५१ मध्ये ६२ दशलक्ष असलेली नागरी लोकसंख्या १९८१ पर्यंत १५९ दशलक्ष झाली.

१४.स्वातंत्र्यानंतरच्या काळात भाषावार प्रांत रचना झाली त्यामुळे अनेक नवीन राज्य अस्तित्वात आली, त्यामुळे या राज्यांच्या कारभारासाठी नवीन राजधान्यांची शहरे निर्माण करावी लागल्यामुळे शहरीकरणात वाढ झाली

१५.भारत देश स्वतंत्र झाल्यानंतरच्या १९५१ जनगणनेमध्ये पहिल्यांदा नागरी लोकसंख्येचे प्रमाण ३.४७ टक्क्यानी सर्वाधिक वाढले असल्याचे दिसून येते.

१६.१९८१ नंतर भारताच्या नागरी लोकसंख्येत सातत्याने वाढ होत असली तरी दशवार्षिक वाढ ही कमी कमी झाल्याचे दिसते.२०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतातील शहरी लोकसंख्या ३७,७१,०५,७६० इतकी असून एकूण लोकसंख्येशी शहरी लोकसंख्येची टक्केवारी ३१.२ टक्के आहे.

१७.२०२१ सालापर्यंत भारताची नागरी लोकसंख्या ५३ कोटीहून अधिक होऊन एकूण नागरी लोकसंख्येची टक्केवारी ४५ टक्क्याहून अधिक होईल असे लोकसंख्या तज्ञांचे मत आहे.

१८.भारतातील मुंबई, दिल्ली आणि कोलकत्ता या शहरांची लोकसंख्या एक कोटीहून अधिक आहे.

**१९.**२०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतात एकूण ५८ दशलक्षी शहरे आहेत.

२०.महाराष्ट्र मध्ये सर्वात जास्त दशलक्षी शहरे आहेत. असून नागरी लोकसंख्येचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक आहे.

२१.केंद्रशासीत प्रदेशातील नागरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण सर्वाधिक आहे.

**२२.**भारतातील घटकराज्यांमध्येही नागरी लोकसंख्येमध्ये मोठया प्रमाणात विषमता आढळून येते

२३.भारतामध्ये ५० टक्क्याहून अधिक नागरी लोकसंख्या असलेली एकूण गोवा आणि मिझोराम ही दोनच घटकराज्य दोन आहेत. तर सातपैकी पाच केंद्रशासीत प्रदेशांची नागरी लोकसंख्येची टक्केवारी ५० टक्क्याहून अधिक आहे.

२४.भारतातील १५ राज्य आणि दोन केंद्रशासीत प्रदेशांची शहरी लोकसंख्या २५ टक्क्याहून अधिक आणि ५० टक्क्याहून कमी आहे.

२५.भारतामध्ये २५ टक्क्याहून कमी नागरीकरण झालेली एकूण १२ राज्य आहेत यामध्ये एकही केंद्रशासीत प्रदेश नाही.

२६. भारतातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी १३.१५ टक्के नागरी लोकसंख्या फक्त महाराष्ट्र या राज्यामध्ये आढळून येते. एकूण नागरी लोकसंख्येच्या संदर्भात भारतामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे.

**२७.**भारतामध्ये हिमाचल प्रदेश १०.१, बिहार ११.३, आसाम १४, त्रिपुरा १६.२, आणि ओडीशा १६.७ टक्के अशी नागरी लोकसंख्या सर्वाधिक कमी असलेली पाच राज्य आहेत.

---

**संदर्भ**


१. मानवी भूगोल (२०१९) – डॉ. ज्योतीराम मोरे, डॉ. संजय पगार, डॉ. अशोक थोरात – निराली प्रकाशन.
२. मानवी भूगोल (२०००) – डॉ. विठ्ठल घारपुरे – पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
३. मानवी भूगोल (२०१५) – प्रा. सवदी, प्रा. कोळेकर – निराली प्रकाशन.
४. कृषी भूगोल (२०१५) – डॉ. संजय पगार, डॉ. ज्योतीराम मोरे, प्रा. अशोक थोरात – अथर्व प्रकाशन
५. कृषी भूगोल (२००९) – शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण केंद्र संपादक – डॉ. पी. व्ही. पाटील, श्री. एच. पी. पाटील, श्री. ए. बी. पाटील
६. मराठी विश्वकोष – https://vishwakosh.marathi.gov.in/
७. https://www.wikipedia.org/